**रेफरन्स (आय टी) नं ८/२००९**
सरतपास नि. यू — ३२९

<u>साक्षीदाराचे नाव : श्री अहमद बख्तीयार खान शपथेवर उलटतपास</u>
<u>श्री जे बी शालीग्राम वकिल प्रथम पक्षकार तर्फे उलटतपास</u>

*{ प्रथम पक्षकार वतीने वकिल श्री जे बी शालीग्राम यांनी निशाणी क्रमांक यु—३२१ च्या अनुक्रमांक ४ ते ६ या कागदपत्रांना निशाणी देणेस हरकत घेतली. त्यांच्या मते हा साक्षीदार त्या कागदपत्रांचा लेखक नसल्याने निशाणी क्रमांक देता येणार नाही. ही कागदपत्रे मुळ कागदपत्रावरून न्यायालयाच्या सहाय्यक अधिक्षक यांनी वेरीफाय केलेली असल्याने व ती कागदपत्रे संघटनेने ठेवली असल्याने व साक्षीदार संघटनेच्या खजिनदार असल्याने ती शाबीत होऊ शकतात म्हणून श्री जे बी शालीग्राम यांनी निशाणी देणेस घेतलेली हरकत नामंजुर करण्यात येत आहे. }*

१०. माझे वय सध्या ३९ आहे हे दाखविण्यासाठी आता माझ्याकडे कोणताही पुरावा नाही, परंतु तोच पुरावा म्हणून पुढील तारखेस दाखल करण्यासाठी मी तयार आहे. मी ज्या वेळी हे प्रतिज्ञापत्र केले त्या वेळेस Orient Express Logistics येथे नोकरीस होतो. तेथे मी सेल्स मॅनेजर म्हणून होतो. सध्या मी DNX Cargo India Private Limited येथे काम करतो. मला सन २००० ते २००७ या काळावधीत कोणतीही नोकरीस नव्हतो.

११. राष्ट्रीय श्रमिक आघाडी ज्या वेळेस स्थापना झाली त्या वेळेस पासून आज पर्यंत मी या संघटनेचा खजिनदार / कोषाध्यक्ष आहे. मी कोषाध्यक्ष आहे म्हणून याबाबतचा कोणताही करार मी दाखल केलेला

नाही. संघटनेच्या घटनेप्रमाणे ( निशाणी क्रमांक यु—३२७ पान क्रमांक ६ clause २१ ) प्रमाणे मी काम केले. माझा अधिकार वरील कलमाप्रमाणे होता. हे खरे की या कलमा व्यतिरिक्त मला काय अधिकार होते हे दाखविण्यासाठी माझ्याकडे पुरावा नाही.

*साक्षीदाराने त्यांचे मुळ कागदपत्रे सोबत आणले नसल्याने प्रथम पक्षकार तर्फे वकिल श्री जे बी शालीग्राम यांनी मुळ कागदपत्रे उलटतपासाच्या वेळेच आवश्यक आहे असे सांगितले. साक्षीदार पुढील तारखेस मुळ कागदपत्रे घेवून येतील असे म्हणाले म्हणूल पुढील उलटतपास तहकूब.*

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत

सही/—

पुणे ( पि. रा. भावके—पाटील )

दिनांक : ८/२/२०१९ सदस्य,औद्योगिक न्यायालय, पुणे